## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २४/०९/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०१२/जा.६७८, दिनांक २६/०९/२०१२.
३) मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांचे वतीने ॲड. श्री. पांडुरंग अे. पोळ यांचे दिनांक ०८/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.
४) मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांचे वतीने ॲड. श्री. पांडुरंग अे. पोळ यांचे दिनांक १०/१०/२०१२ रोजी प्राप्त लेखी निवेदन.
५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कोनगांव पोलिस ठाणे, भिवंडी यांचे दिनांक ११/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.
६) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून प्राप्त रासायनिक पृथःकरण अहवालाची छायांकित प्रत.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०१२/जा.२८९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४००.०२०.
दिनांक : १८/३ /२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १२/०९/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. इंद्रा सेल्स एजन्सीज, एडिबल ऑईल मर्चंट, १४२६/१, पाण्याच्या टाकीच्या मागे, कोनगाव, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील गाळ्यामध्ये ११:४० वाजता प्रवेश केला करुन तेथे उपस्थित असलेल्या इसमांकडे अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता, त्यांनी त्याने त्यांचे नाव इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल असल्याचे सांगून ते मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक असून त्यांचे सोबत त्यांचे भाऊ कौशिकभाई गोवर्धनभाई पटेल व मुलगा भौमिक इंद्रवन पटेल असल्याचे सांगून ते लालचौकी, कल्याण येथे राहतात व सदर पत्त्यांवर मागील १० वर्षापासून ऑईल एजन्सीचा व्यवसाय करीत असल्याचे पंचासमक्ष सांगितले. तदनंतर पथकाने परीसराची पाहणी केली असता गाळ्याच्या आतील बाजूस दोन मजूर काम करीत असताना दिसले मात्र पथकाने

00गाळ्यामध्ये प्रवेश करताच सदर दोन्ही मजूर तेथून पसार झाले. पथकातील अधिकाऱ्यांनी भ्रमणध्वनीद्वारे भिवंडी शिधावाटप कार्यालयातील सहायक शिधावाटप अधिकारी, श्रीमती एस.बी.पालकर यांना त्वरीत घटनास्थळी उपस्थित राहण्यास सांगून पंचासमवेत गाळ्याची/गोडाऊनमधील एकंदरीत जागेची पाहणी केली असता, त्यांना गोडाऊनच्या प्रवेशद्वारालगत बहुतांश तेलाने भरलेली एक भूमिगत लोखंडी टाकी व टाकीशेजारील इलेक्ट्रीक मोटारीला भूमिगत टाकीतून येणारा एक पाईप जोडला असल्याचे तसेच पोटमाळ्यावर जाणारे तीन पाईप, सदर तीनही पाईपला चालू-बंद करावयाचे कॉक लावलेले असल्याचे आढळून आले. सदर तीनही पाईप पोटमाळ्यावरील टाकी क्र. १, २ व ३ मध्ये जोडलेले आढळले. टाकीच्या पुढील बाजूस आतमध्ये लाकडी पार्टीशन टाकून व्यावसायिकाने व्यावसायिक आस्थापनेचे कार्यालय असल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी डाव्या बाजूने आत प्रवेश केल्यानंतर रिकामे तसेच काही भरलेले तेलाचे सीलबंद डबे व लेबल नसलेले मात्र तेलाने भरलेले डबे ठेवलेले आढळून आले. गोडाऊनच्या उजव्या बाजूस आतमध्ये फिलींग आणि पॅकींग करण्यात येणारे तेलाचे एक मशिन, तेलाच्या डब्यास झाकण लावणारे एक मशिन, इलेक्ट्रीक वजन काटा आणि गाळ्याच्या मागील बाजूस पाऊच पॅकींग, फिलींगचे एक मशिन, डब्याला लावण्यात येणारी झाकणे, प्लास्टिकच्या पिशव्या, युनिटचे ब्रांडनेम असलेले पॅकींग कार्टुन्स इ. आढळून आले. गोडाऊनच्या वरच्या बाजूस पोटमाळ्यावर तीन लोखंडाच्या मोठ्या आकाराच्या तेलाच्या टाक्या असल्याचे पथकास निदर्शनास आले. सदर टाक्यांमधून पाईपलाईन काढलेली असल्याचे व टाकी क्र. १ व २ मधून एक अशी व टाकी क्र. ३ मधून दोन पाईप लाईन फिलींग मशिनमध्ये असलेल्या छोट्या उघड्या चौकोनी आकाराच्या लोखंडी टाकीत उघडत असल्याचे दिसून आले. वरील तिन्ही टाक्यांमधील तेल फिलींग मशिनच्या छोट्या टाकीत उघडून पाईपद्वारे एकत्रित टाकले जात असल्याचे दिसून आल्याने तपासी अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष इंद्रवदन पटेल यांचेकडे करत असलेल्या तेलाच्या व्यापाऱ्याबाबत तसेच व्यवसायाच्या पद्धतीबाबत चौकशी केली असता, त्यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

सदर खाद्यतेलाच्या पॅकींग युनिटमध्ये भरुन येणारा खाद्यतेलाचा अंदाजे १० मे. टन क्षमतेचा टँकर प्रथमत: पाईपद्वारे गोडाऊनच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या भूमिगत तेलाच्या टाकीमध्ये उतरविला जात असल्याचे सांगून भूमिगत टाकीच्या बाजूस असलेल्या इलेक्ट्रिक मोटारच्या साहाय्याने पाईपद्वारे गोडाऊनच्या पोटमाळ्यावर असलेल्या तीन वेगवेगळ्या प्रत्येकी अंदाजे ९ टन क्षमतेच्या संबंधित टाक्यांमध्ये तेल टाकले जात असल्याचे सांगितले. सदर टाक्या अनुक्रमे टाकी क्र. (१) शेंगदाणा तेल, (२) पामतेल आणि (३) सोयाबीन तेलाकरीता असून त्याप्रमाणे सदर तेल वेगवेगळे साठवणूक करुन ठेवत असल्याचे सांगितले. पॅकींगकरीता येणाऱ्या ऑर्डर्सनुसार त्या-त्या तेलाच्या टाकीतील वेगवेगळ्या पाईपद्वारे फिलींग मशिनमध्ये असलेल्या मागणीनुसार प्रत्येकी १ लि., २ लि., ५ लि. व १५ लि. च्या प्लास्टिक बॉटल्स व पत्र्याच्या डब्यांमध्ये भरले जात असल्याचे सांगून त्याखाली पॅकींग करण्यात येणाऱ्या तेलाचे वजन केले जाते व बाजूच्या मशिनद्वारे त्याचे टोपन बंद केले जाते नंतर त्यावर त्यांच्या युनिटचे

ब्रँडनेमची स्टिकर्स व इतर माहिती असलेली कागदी/प्लास्टिक स्टिकर्स चिकटवली जात असल्याचे सांगून त्या लगत असलेल्या पाऊच फिलींग मशिनमध्ये १ लि. चे पाऊच तेलाचे पॅकींग केले जाते. मात्र गेल्या ४ ते ५ वर्षापासून सदर मशिन बंद असल्याचे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी पंचासमक्ष सांगितले व त्याप्रमाणे लेखी जबाब लिहून दिलेला आहे.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष पाहणी केल्यानुसार पोटमाळ्यावरुन येणाऱ्या तीन वेगवेगळ्या टाक्यांमधील तेल फिलींग मशिन मध्ये येणाऱ्या वरच्या भागात एकत्रितपणे येत असल्याचे दिसून आले. गोडाऊनच्या/गाळ्याच्या पॅकींग मशिनच्या बाजूच्या भागात आढळून आलेला तेलाचा साठा इंद्रवन पटेल व पंचासमक्ष अधिकाऱ्यांनी मोजदाद केला असता तो पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले. चौकोनी आकाराचे पत्र्यांचे डबे ज्यावर खालीलप्रमाणे ब्रॅन्डनेमचे स्टिकर चिकटवलेले आढळले.

| अ.क्र. | मालाचे वर्णन (ब्रँडनेम) | संख्या | वजन (प्रत्येकी) | एकूण वजन (किलोमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | इंद्रा बेस्ट अे-१ (मुंगफली तेल) | २१६ | १५ | ३२४० |
| २. | इंद्रा बेस्ट अे-१ (मुंगफली तेल) | ६६ | ५ | ३३० |
| ३. | सनफ्लॉवर | ७ | १० | ७० |
| ४. | सनफ्लॉवर, सनटच, इंद्रा | २ | १५ | ३० |
| ५. | लेबल नसलेले (मुँगफली तेल) | ११ | १५ | १६५ |
| | | | एकूण | ३८३५ किलो |

त्यानंतर गाळ्यालगत असलेल्या बाजूच्या जिन्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष वर जाऊन पाहणी केली असता, पोटमाळ्यावर तेलाच्या तीन टाक्या, तेल पॅकींगकरीता आवश्यक असलेल्या रिकाम्या प्लास्टिकच्या बाटल्या व पुठ्ठ्याचे गट्ठे व ब्रॅन्ड नेमचे स्टिकर्स इ. स्टेशनरी असल्याचे आढळून आली. तसेच अधिकाऱ्यांनी सदर जिन्याने पुन्हा खाली उतरुन जिन्यालगतच्या दुसऱ्या गाळ्याची पाहणी केली असता, तेथे रिकामे व काही भरलेले तेलाचे सीलबंद डबे व लेबल नसलेले रिकामे डबे आढळून आले. पथकाने सदर गाळा क्र. २ मध्ये आढळून आलेल्या साठ्याची पंचासमक्ष मोजदाद केली असून ती पुढीलप्रमाणे आढळून आली.

| अ.क्र. | मालाचे वर्णन (ब्रँडनेम) | संख्या | वजन (प्रत्येकी) | एकूण वजन (किलोमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | डबल फिल्टर मूँगफली तेल | २०० | १५ | ३००० |
| २. | पुनम मूँगफली तेल | १० | ५ | ५० |
| ३. | इंद्रा रिफाईन्ड मूँगफली तेल | १५ | १५ | २२५ |
| ४. | इंद्रा बेस्ट, सुपर काठीयावाडी, बेस्ट अे-१ मूँगफली तेल | ५५ | २० | ११०० |
| ५. | सनटच, सनविटा, बेस्ट ए-१ सूर्या, इंद्रा, गणेश (मूँगफली व शेंगदाणा) | ९३ | २० | १८६० |
| ६ | बेस्ट अे-१ मूँगफली तेल | ८ | ५ | ४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | सनटच, सनफ्लॉवर तेल | १२ | १५ | १८० |
| ८. | गणेश सोयाबीन ऑईल | २ | ५ | १० |
| | | | एकूण | ६४६५ |

तद्नंतर पथकातील अधिकाऱ्यांनी आस्थापनेचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल ह्यांचेसमवेत गोडाऊनच्या प्रथम गाळ्यातील पोटमाळ्यावर असलेल्या तीन टाक्यांमधील व प्रवेशद्वाराजवळ असलेल्या भूमिगत टाकीमधील तेलाच्या साठ्याची मोजदाद केली असता, तो पुढीलप्रमाणे आढळून आला, टाकी क्र. १ मध्ये शेंगदाणा तेल, क्र. २ मध्ये पामतेल, क. ३ मध्ये सोयाबीन तेल आणि भूमिगत टाकीमध्ये पामतेल असल्याचे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी सांगितले. इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांचेकडे टाकीतील तेल मोजण्याकरीता डिप, कॅलिबरेशन चार्ट उपलब्ध नव्हता, टाकीत किती तेल आहे ते त्याला अंदाजे समजते असे सांगितले.

त्यामुळे तेलाचे मोजमाप करणेसाठी सदर टाक्यांचे मोजमाप केले. अनुक्रमे टाक्यांचे मोजमाप घेण्यात आले. टाकी क्र. १, २ व ३ ची लांबी, रुंदी व उंची सारखीच म्हणजेच अनुक्रमे १२०, ९६ व ६० इंच असल्याने टाकीचे एकूण क्षेत्रफळ ६९१२०० घनइंच आले. नंतर प्रत्येक टङ्क्रितील तेलाची उंची मोजण्यात आली व त्यावरुन त्या त्या टाकीतील तेलाचे क्षेत्रफळ व व्हॉल्युम काढले. टाकी क्र. १ मधील तेलाची उंची २२ इंच असल्याने टाकी क्र. १ मधील तेलाचे व्हॉल्युम २५३४४० घनइंच आल्याने कन्व्हर्टर वापरुन घनइंचाचे लीटरमध्ये रुपांतर केले असता ते ४१५३ लिटर असे आले. सदर लिटर्सचे ग्रॅममध्ये रुपांतर केले असता ते ३७७९२३० ग्रॅम म्हणजेच ३.७१ मे. टन तेल साठा टाकी क्र.१ मध्ये असल्याचे आढळले. यानुसार टाकी क्र. २ व ३ मधील तेल साठ्याची ही वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करुन अनुक्रमे २.१९ व ५.७४ मे. टन तेल साठा काढण्यात आला. भूमिगत टाकीची लांबी, रुंदी व उंची अनुक्रमे ४५,६० व ५० इंच असून टाकीतील तेलाची उंची ३४ इंच असल्याने वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करुन भूमिगत टाकीतील तेलाचा साठा १.३४ मे. टन इतका आढळला.

| टाकी | तेलाचा प्रकार | साठा (मे. टनमध्ये) |
|---|---|---|
| टाकी क्र.१ | शेंगदाणा तेल | ३.७१ |
| टाकी क्र.२ | पामतेल | २.१९ |
| टाकी क्र.३ | सोयाबीन मंज | ५.७४ |
| भूमिगत टाकी | पामतेल | १.३४ |
| | एकूण | १२.९८ |

उपरोक्तप्रमाणे आस्थापनेचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी दर्शविल्यानुसार पॅक केलेल्या व टाकीतील तेलाचा एकूण साठा २३,२८० किलो म्हणजे २३.२८ मे. टन असल्याचे पंचासमक्ष आढळून आले. तसेच इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांचेकडे तेलाच्या साठ्यासंदर्भात किंवा व्यवसायाकरिता आवश्यक असलेल्या परवान्यांबाबत चौकशी केली असता, त्यांनी दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंत वैध असलेला घाऊक खाद्यतेल परवाना क्र.

३७-फ/भिवंडी/४२ (घा), सन २०१२-२०१३ करिता असलेला ग्रामपंचायत परवाना प्रमाणपत्र क्र. २८८, दिनांक १२.०३.२०१४ पर्यंत वैध असलेला वजनमापे परवाना क्र. ९१७५१८ व दिनांक १२.०३.२०१४ पर्यंत वैध असलेले वजनमापे परवाना क्र. ९१७५१७ व ९१७५१९, अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत क्र. ११५१२०१४०००२१७ तसेच ट्रेड मार्क-पूनम मूँगफलीका तेल करिता व्यापार चिन्ह रजिस्ट्री क्र. ६८३३३९ व ट्रेड मार्क- भौमिक अे-१ मूँगफलीका तेल करिता व्यापार चिन्ह रजिस्ट्री क्र. ७०९६०६ ही कागदपत्रे पंचांसमक्ष सादर केली.

तथापी, उपरोक्त नोंदणीकृत असलेल्या ट्रेडमार्क व्यतिरिक्त पॅक केलेल्या डब्यावर चिकटवावयाच्या इतर ब्रँडनेमच्या स्टिकर्स १) इंद्रा इंपोर्टेड, २) आरबीडी पामोजिन ऑईल, ३) गणेश रिफाईंड सोयाबीन, ४) सन टच रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल घटनास्थळी आढळून आल्या. अशा एकूण सहा प्रकारच्या स्टिकर्सचे प्रत्येक एक याप्रमाणे पंचासमक्ष नमुने घेऊन परवानाधारकाची स्वाक्षरी घेण्यात आली.

तपासणीदरम्यान परवानाधारकाने त्याचेकडील साठा नोंदवही व खरेदी बिले दाखविली. तथापि, विक्री नोंदवही, विक्री पावती पुस्तक नसल्याचे सांगून सर्व व्यवहार रोखीने होत असल्याचे सांगितले. साठा नोंदवहीच्या पडताळणीत परवानाधारकाने दि. १ जून, २०१२ ते १२ सप्टेंबर, २०१२ या कालावधीत एकूण २०५३५० किलो पामतेल, १०५२५ किलो शेंगदाणा तेल, १००२० किलो सूर्यफूल तेल व ७९४३५ किलो सोयाबीन तेल आवक केल्याचे आढळले. गाळ्यातील पॅक केलेल्या डब्यांमध्ये एकूण १०३०० किलो साठ्यापैकी मूँगफली (शेंगदाणा) तेलाचा साठा १००१० किलो तर सूर्यफूल तेलाचा साठा २८० किलो व सोयाबीन तेलाचा साठा १० किलो असल्याचे आढळले. यावरुन शेंगदाणा तेलाचा पॅकबंद साठा सर्वात जास्त असल्याचे दिसून आले. तसेच आवक नोंदवहीच्या पडताळणीत परवानाधारकाने दि. १ जून, २०१२ ते १२ सप्टेंबर, २०१२ या कालावधीत केवळ एकवेळा शेंगदाणा तेलाची आवक केली आहे. तर पामतेल २०५३५० किलो आयात केलेले आहे. मोठ्या प्रमाणावर आयात केलेल्या पामतेलाबाबत संबंधित परवानाधारकाकडे विचारणा केली असता सदर पामतेल पॅक करुन विक्री केले जात असल्याचे परवानाधारकाने चौकशीत सांगितले. तथापि, पामतेलाचा पॅकींग केलेला कोणत्याही वजनाचा एकही डबा/बाटली तपासणीदरम्यान आढळून न आल्याने परवानाधारकास पामतेल विक्री नोंदवही/पावती पुस्तक दाखविण्यास सांगितले असता, त्यांनी सदरचे अभिलेख ठेवत नसल्याचे पंचासमक्ष सांगितले. यावरुन इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल हे विक्री करत असलेल्या शेंगदाणा, सूर्यफूल व सोयाबीन या तेलांच्या पॅकबंद डब्यात पामतेलाची भेसळ करुन विकत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले.

इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांच्या घाऊक खाद्यतेल परवान्यांची तपासणी केली असता, परवान्यातील अट क्र. ८ मध्ये असा उल्लेख आहे की, परवानाधारक अनुसूचित वस्तूंची विक्री करत असताना घाऊक व्यापाऱ्यांना किंवा किरकोळ व्यापाऱ्यांना किंवा ग्राहकांना विक्री केलेल्या अशा सर्व विक्रीची स्वतंत्र नोंदवहीमध्ये तो हिशेब ठेवील

0006 आणि ती नोंदवही आणि रोखीचे टिप्पण अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्यास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास मागणी केल्यावर निरीक्षणास सादर करील. परंतु इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी विक्री नोंदवही ठेवली नसल्याने ते कोणास व कोणते तेल किती विक्री करतात हे समजून येत नाही. तसेच अट क्र. ९ मधील तरतुदीप्रमाणे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी कोणत्याही प्रकारचा माहिती फलक, साठा फलक, भाव फलक लावलेला नाही. अट क्र. १० मधील तरतुदीनुसार ग्राहकास पावती देणे बंधनकारक असताना व पावतीवर परवानाधारकाचे नाव, पत्ता, परवाना क्रमांक, ग्राहकांचे नाव, दिनांक, विक्री परिमाण, किंमत आणि एकूण किंमत दर्शविणे व सदर पावतीची स्थळप्रत ठेवणे आवश्यक असताना पटील यांनी अशी कोणतीही पावती पुस्तकाची स्थळप्रत ठेवली नाही. यावरुन सदर विक्री अवैध असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे मे. इंद्रा सेल्स एजन्सी या नमूद पॅकींग युनिटमध्ये वरील विविध टाक्यांमधून येणारे तेल हे एकत्र एकाच छोट्या टाकीत येऊन तेथे एकत्रितरित्या पॅक होत असल्याचे दिसून आल्याने तसेच वेगवेगळ्या प्रकारचे तेल एकत्र करणे या मागे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांचा तेल भेसळीचा उद्देश स्पष्ट होत आहे. मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक ते विक्री करत असलेल्या शेंगदाणा, सोयाबीन, सूर्यफूल या तेलात पामतेल मिसळून असे भेसळयुक्त तेल विक्री करुन जनतेचे आरोग्य धोक्यात आणणे तसेच जनतेची व शासनाची फसवणूक करत असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी उपरोक्तप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारच्या तेलाची आवक मागणी करुन त्याप्रमाणे ती आवक साठा पुस्तकात वेगवेगळी दर्शविणे आवश्यक असताना तशी नोंद न घेता एकत्रित नोंदी घेतल्या असून विक्रीची कोणतीही नोंद ठेवलेली नाही. यावरुन पूर्ण खाद्यतेल एकत्र दर्शविण्यामागे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांचा तेल भेसळीचा उद्देश सिद्ध झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द, महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापाराची अनुज्ञप्ती आदेश, १९९८ चे कलम २, ३, ११, १३, १४ व १५, सदर आदेशाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीतील अट क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० व १३ तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० चा भंग केल्याने कोनगाव पोलिस ठाणे, ता. भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१२ दिनांक १३/०९/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | | मुद्देमालाचा तपशील | अंदाजे वजन (मे. टनमध्ये) | जप्त मुद्देमालाची बाजारभावाप्रमाणे अंदाजे किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | टाकी क्रमांक-१ | खाद्यतेलाचा साठा | ३.७१ | २,७८,२५०/- |
| २. | टाकी क्रमांक-२ | | २.१९ | १,६४,२५०/- |
| ३. | टाकी क्रमांक-३ | | ५.७४ | ४,३०,५००/- |
| ४. | भूमिगत टाकी | | १.३४ | १,००,५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | गाळा क्र.१ व २ मधील पॅक डब्यातील एकूण तेल साठा | | १०.३० | ७,७२,५००/- |
| | | एकूण खाद्यतेलाचा साठा | २३.२८ | १७,४६,०००/- |
| ६. | पॅकींग/फिलींग मशिन | | २ नग | १,७५,०००/- |
| ७. | रिकामे पत्र्याचे व प्लास्टिकचे डबे | | अंदाजे ८०० नग | २०,०००/- |
| | | | एकूण खाद्यतेल व इतर जप्त मुद्देमालाची किंमत | १९,४१,०००/- |

घटनास्थळी पथकाने पोटमाळ्यावरील तीन टाक्यांमधील, एक भूमिगत टाकीतील, तीन टाक्यांमधून एकत्रितपणे फिलींग व पॅकींग करण्यात येणाऱ्या छोट्या लोखंडी मशिनमधील तसेच मशिनच्या जवळच असलेल्या नुकत्याच भरण्यात आलेल्या व लेबल नसलेल्या डब्यातील व कागदी पुठ्ठ्यामध्ये लेबल लावून सीलबंद करण्यात आलेल्या डब्यातील असे एकूण सात प्रकारचे तेलाचे नमुने पंचासमक्ष घेऊन पुढील कार्यवाहीकरीता ताब्यात घेतले. घटनास्थळी आढळून आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने कोणगाव पोलीस ठाणे यांचे घटनास्थळी उपस्थित पथकासमक्ष जप्त करण्यात आलेला मुद्देमाल जागीच सीलबंद करुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १०/१०/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांचे वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांनी वकालतनाम्यासह उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल उपस्थित राहिले. तथापी, सदर सुनावणी तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून प्राप्त रासायनिक पृथःकरण अहवालात, “Exhibit Nos. 1,5,6 & 7 contain groundnut oil, Exhibit Nos. 2 & 4 contain palm oil, & Exhibit No. 3 contain soyabean oil.” असे नमुद केले आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांचे वतीने ॲड. श्री. पांडुरंग अे. पोळ यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या अशिलाने विविध खाद्यतेलाच्या टाक्यांमधील पाईपलाईन हे अंतिम टोकास एकत्रित करुन त्याठिकाणी एकाच पाईपमधून विविध तेलांचे पॅकींग होत असल्याने सदरच्या कार्यपद्धतीमुळे त्यांचे अशिल हे विविध खाद्यतेलामध्ये पामतेलाचे भेसळ करीत असल्याचे कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केले आहे. परंतू, त्यांचे अशिल हे वरील नमुद कार्यपद्धत अंमलात आणीत असले तरी ते एका वेळेस एकाच खाद्यतेलाची पॅकींग करीत असल्याचे नमूद करुन त्यांचे अशिल हे पामतेलाची विक्री करीत नसल्याने त्यांनी अनुज्ञाप्ती आदेशामधील तरतूदी तसेच जीवनावश्यक वस्तु कायद्याचे भंग केलेला नाही. त्यामुळे त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा विनाअटीचा मुक्त करण्यात यावा. त्यांचे अशिल हे १९९८ च्या आदेशान्वये आवश्यक परवानगी घेवुन खाद्यतेलाचा व्यवसाय करीत असुन त्याअनुषंगाने गुमास्ता परवाना धारण केला असुन ते रितसर विक्रीकर भरीत असल्याचे सांगुन सदर व्यवसायासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग यांचेकडील अनुज्ञाप्ती धारण केल्याचे सांगितले. घटनास्थळी साठा फलक तसेच विक्री पावत्या उपलब्ध नसल्याचे नोटीसीमध्ये नमूद केले आहे. परंतू, अभिलेखावरुन असे दिसून येते की त्यांचे अशिलाने साठा फलक प्रदर्शित केला असुन पामतेलाच्या विक्रीचे विक्री बिलेही त्यांचेकडे उपलब्ध आहेत. जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतूदींचे अवलोकन करता उत्पादन, वितरण व विक्रीच्या प्रक्रियेमध्ये कोणताही गुन्हा केल्याचे आढळुन येत नाही. जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-अ अंतर्गत आदेश पारित करण्यापुर्वी पुढील नमूद बाबींचा प्रकर्षाने विचार करावा की, त्यांचे अशिलाने केवळ तांत्रिक बाबींचे उल्लंघन केले आहे. तसेच व्यापारी म्हणुन नफाखोरीच्या उद्देशाने साठेबाजी केलेली नाही. त्यामुळे काळेबाजार अथवा साठवणूक केल्याने स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यांचे अशिलाने सदर व्यवसायाकरीता १,४०,००,०००/- रुपयांचे कर्ज घेतले असुन त्यांचे अधिपत्याखाली बरेच कामगार काम करीत आहेत. सदरचा व्यवसाय बंद असल्याने कर्जाचे हप्ते तसेच कामगारांचे वेतन त्यांना अदा करणे शक्य झाले नाही. तपासणी अधिकाऱ्याने बेकायदेशिररित्या अधिकार नसतानाही त्यांचे अशिलाचा व्यवसाय बंद केला असल्याने तो तात्काळ सुरु करण्यास संबंधितांना निर्देशित करण्यात यावे असे सांगुन, तसे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कोनगांव पोलिस ठाणे, भिवंडी यांचे दिनांक ११/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्याचे घटनास्थळी असलेल्या तीन लोखंडी मोठ्या आकाराच्या टाक्यांमधील शेंगदाणा, सोयाबीन, पामतेल असे खाद्यतेल पाईपलाईनद्वारे फिलिंग मशिनमध्ये असलेल्या छोट्या उघड्या चौकोनी आकाराच्या लोखंडी टाकीत सोडले जाते. वास्तविक पाहता तीनही टाकीमधील असलेले खाद्यतेल वेगवेगळ्या

ठिकांणाहुन वितरीत होणे आवश्यक होते. परंतु, आरोपीत याने भेसळ करण्याच्या उद्देशाने एकाच फिलिंग मशिनमध्ये खाद्यतेल एकत्रित केल्याचे आढळुन आले आहे. आरोपीने खाद्यतेल साठा नोंदवही, खरेदी, बिले फिर्यादी यांना दाखविली. परंतु विक्री रजिस्टर, विक्री पावती पुस्तक त्याने ठेवले नाही. खाद्यतेलापैकी पामतेल विक्री नोंदवही पावती पुस्तक इ. अभिलेख ठेवला नाही. घटनास्थळी पॅकींग युनिटमध्ये ३ टाक्यांमध्ये येणारे तेल हे एकत्र एकाच छोट्या टाकीत येते व तेथून पॅक होते. वेगवेगळ्या प्रकारचे तेल एकत्र करण्यामागे भेसळ करण्याचा उद्देश दिसुन येतो. नमुना खाद्यतेल तपासणी अभिप्राय अद्याप प्राप्त झालेला नाही. नमुना खाद्यतेलाच्या तपासणी आशयाचे अवलोकन केल्यानंतर जप्त मुद्देमाल संबंधित आदेश निर्गमित होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १२/०९/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. इंद्रा सेल्स एजन्सीज, एडिबल ऑईल मर्चंट, १४२६/१, कोनगाव, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील गाळ्यामध्ये भेट देवुन तपासणी केली असता मे. इंद्रा सेल्स एजन्सी या नमूद पॅकींग युनिटमध्ये विविध टाक्यांमधून येणारे तेल हे एकत्र एकाच छोट्या टाकीत येऊन तेथे एकत्रितरित्या पॅक होत असल्याचे दिसून आल्याने तसेच वेगवेगळ्या प्रकारचे तेल एकत्र करणे या मागे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांचा तेल भेसळीचा उद्देश स्पष्ट होत असल्याचे पथकास प्रथमदर्शनी दिसुन आले. मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक ते विक्री करत असलेल्या शेंगदाणा, सोयाबीन, सूर्यफूल या तेलात पामतेल मिसळून असे भेसळयुक्त तेल विक्री करुन जनतेचे आरोग्य धोक्यात आणणे तसेच जनतेची व शासनाची फसवणूक करत असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी उपरोक्तप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारच्या तेलाची आवक मागणी करुन त्याप्रमाणे ती आवक साठा पुस्तकात वेगवेगळी दर्शविणे आवश्यक असताना तशी नोंद न घेता एकत्रित नोंदी घेतल्या असून विक्रीची कोणतीही नोंद ठेवलेली नाही. यावरुन पूर्ण खाद्यतेल एकत्र दर्शविण्यामागे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांचा तेल भेसळीचा उद्देश सिद्ध झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एकुण रु. १९,४१,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांचे वतीने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाश्यात विविध खाद्यतेलाच्या टाक्यांमधील पाईपलाईन हे अंतिम टोकास एकत्रित करुन त्याठिकाणी एकाच पाईपमधून विविध तेलांचें पॅकींग होत

0010

असल्याने सदरच्या कार्यपद्धतीमुळे ते विविध खाद्यतेलामध्ये पामतेलाचे भेसळ करीत असल्याचे नोटीसमध्ये नमूद केले आहे. परंतू, सदर कार्यपद्धत अंमलात आणीत असले तरी ते एका वेळेस एकाच खाद्यतेलाची पॅकींग करीत असल्याचे नमूद करुन ते पामतेलाची विक्री करीत नसल्याने त्यांनी अनुज्ञाप्ती आदेशामधील तरतूदी तसेच जीवनावश्यक वस्तु कायद्याचे भंग केलेला नाही असे सांगितले. घटनास्थळी साठा फलक तसेच विक्री पावत्या उपलब्ध नसल्याचे नोटीसीमध्ये नमूद केले आहे. परंतू, त्यांनी साठा फलक प्रदर्शित केला असुन पामतेलाच्या विक्रीचे विक्री बिलेही त्यांचेकडे उपलब्ध आहेत. जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतूदींचे अवलोकन करता उत्पादन, वितरण व विक्रीच्या प्रक्रियेमध्ये कोणताही गुन्हा केला नसुन त्यांनी केवळ तांत्रिक बाबींचे उल्लंघन केले आहे. तसेच व्यापारी म्हणुन नफाखोरीच्या उद्देशाने साठेबाजी केलेली नाही. त्यामुळे काळेबाजार अथवा साठवणूक केल्याने स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे सांगितले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कोनगांव पोलिस ठाणे, भिवंडी यांचे अभिवेदनात, सदर गुन्ह्याचे घटनास्थळी असलेल्या तीन लोखंडी मोठ्या आकाराच्या टाक्यांमधील शेंगदाणा, सोयाबीन, पामतेल असे खाद्यतेल पाईपलाईनद्वारे फिलिंग मशिनमध्ये असलेल्या छोट्या उघड्या चौकोनी आकाराच्या लोखंडी टाकीत सोडले जाते. वास्तविक पाहता तीनही टाकीमधील असलेले खाद्यतेल वेगवेगळ्या ठिकांणाहुन वितरीत होणे आवश्यक होते. परंतु, आरोपीत याने भेसळ करण्याच्या उद्देशाने एकाच फिलिंग मशिनमध्ये खाद्यतेल एकत्रित केल्याचे आढळुन आले आहे. आरोपीने खाद्यतेल साठा नोंदवही, खरेदी, बिले फिर्यादी यांना दाखविली. परंतु विक्री रजिस्टर, विक्री पावती पुस्तक त्याने ठेवले नाही. खाद्यतेलापैकी पामतेल विक्री नोंदवही पावती पुस्तक इ. अभिलेख ठेवला नाही. घटनास्थळी पॅकींग युनिटमध्ये ३ टाक्यांमध्ये येणारे तेल हे एकत्र एकाच छोट्या टाकीत येते व तेथून पॅक होते. वेगवेगळ्या प्रकारचे तेल एकत्र करण्यामागे भेसळ करण्याचा उद्देश दिसुन येत असल्याचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ११(१) अन्वये "No licensee or his agent or servant or any other person acting on his behalf shall contravene any of the terms and conditions of the license " असे नमूद आहे.

कलम १३ अन्वये " Maintenance of registers of transactions- Every licensee shall maintain a register of transactions as laid down in the terms and conditions of his licence and shown there in the names, addresses and such other particulars of transactions as the licensing authority may specify " असे नमूद आहे.

कलम १५(c)(i) अन्वये Seize " Any stock of scheduled commodities in respect of which he has reasons to believe that a contravention of any provisions of this order has been, is being, or is about to be commited " असे नमूद आहे.

मे. इंद्रा सेल्स एजन्सीज यांच्याकडे खाद्यतेलाच्या व्यवसायाकरिता आवश्यक असलेला दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंत वैध असलेला घाऊक खाद्यतेल परवाना क्र. ३७-फ/भिवंडी/४२ (घा) आहे. मे. इंद्रा सेल्स एजन्सीज, एडिबल ऑईल मर्चटचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांच्या गाळ्यात पथकास घटनास्थळी गंभीर स्वरुपाचे त्रुटी आढळुन आल्या असुन तपासणीचेवेळी मे. इंद्रा सेल्स एजन्सीजचे मालक यांनी सर्व व्यवहार रोखीने होत असल्याने विक्री नोंदवही तसेच विक्री पावती पुस्तक ठेवले नसल्याचे पंचांसमक्ष कबुल केले आहे. पथकाने साठा नोंदवही पडताळली असता दिनांक ०१ जुन, २०१२ ते १२ सप्टेबंर, २०१२ या कालावधीत पामतेल, शेंगदाणा तेल, सुर्यफुल तेल व सोयाबीन तेलाची आवक झाल्याच्या नोंदी आढळल्या. परंतू, प्रत्यक्ष साठ्याची मोजदाद केली असता बहुतांश साठा हा शेंगदाणा तेलाचा व उर्वरीत खाद्यतेलाचा अल्प साठा आढळुन आला. तथापी, साठा पुस्तकानुसार सदर कालावधीत केवळ एक वेळा शेंगदाणा तेलाची आवक नोंद आढळुन आली ही साशंकता निर्माण करणारी बाब आहे. तपासणीचे वेळी पामतेलाचा साठा हा विविध क्षमतेच्या पॅकींगमध्ये पॅकींग करुन विक्री करीत असल्याचे इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी सांगितले. तथापी, पामतेलाचा पॅकींग केलेला साठा पथकास आढळुन न आल्याने अधिक खातरजमा करण्याकरीता विक्री नोंदवही/पावती पुस्तक सादर करण्यास सांगितले असता, इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी सदरचा अभिलेख ठेवत नसल्याचे सांगितले. यावरुन इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल हे विक्री करत असलेल्या शेंगदाणा, सुर्यफुल व सोयाबीन या खाद्यतेलांच्या पॅकबंद डब्यात पामतेलाची भेसळ करुन विक्री करीत असल्याचे पथकास प्रथमदर्शनी दिसुन आले. तपासणीचेवेळी परवानाधारक म्हणून मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांनी विक्री नोंदवही ठेवली नसल्याने ते कोणास व कोणते तेल किती विक्री करतात हे समजून येत नाही. तसेच कोणत्याही प्रकारचा माहिती फलक, साठा फलक व भावफलक प्रदर्शित केलेला नाही. तसेच ग्राहकास पावती देणे बंधनकारक असताना व पावतीवर परवानाधारकाचे नांव, पत्ता, परवाना क्रमांक, ग्राहकांचे नांव, दिनांक, विक्री परिमाण, किंमत आणि एकुण किंमत दर्शविणे व सदर पावतीची स्थळप्रत ठेवणे आवश्यक असताना अशा कोणत्याही पावती पुस्तकांच्या स्थळप्रती तपासणीचे वेळेस सादर केले नाही

मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांनी तपासणीचे वेळी घटनास्थळी आवश्यक महत्वपूर्ण अभिलेख सादर केला नाही व तसे सादर न केल्याचे कबुल केले आहे. मे. इंद्रा सेल्स एजन्सीस या नांवे खाद्यतेलाचा घाऊक व्यवसाय करीत असतांना साठा मालक म्हणुन ते करीत असलेल्या व्यवसायात व त्या अनुषंगाने आवश्यक अभिलेखात पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. परंतु तपासणीचे वेळी पथकास या महत्वपूर्ण बाबींचा अभाव असल्याचे सिध्द झाले आहे. प्रचलित नियमानुसार व्यवसाय करीत असतांना परवानाधारकास साठा खरेदी करतांना पुरवठादाराकडून खरेदी बिले प्राप्त करणे त्या अनुषंगाने साठा पुस्तकात नोंदी घेणे तसेच ते पॅकिंग करीत असलेल्या विविध प्रकारच्यां खाद्यतेलाची प्रत्यक्षात उपभोक्त्यास विक्री करीत असतांना त्यांनी केलेल्या प्रत्येक विक्री व्यवहाराची बिले तयार करुन

 महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ४(२) अन्वये देण्यात आलेल्या घाऊक परवानामधील अट क्र. ३(i) नुसार The licensee shall, except when specifically exempted by the Government or by the licensing authority in this behalf maintain a register of daily accounts for each of the commodities mentioned in paragraph (i) showing correctly –

(a) the opening stock of each day.

(b) the quantities received on each day showing the place from where and the source from which received.

(c) the quantities, delivered or otherwise removed on each day, showing the places of destination; and

(d) the closing stock on each day.

अट क्र. ६ अन्वये The licensee shall not-

(a)(i) enter into any transaction involving purchased, sale or storage for sales of commodities in a speculative manner prejudicial to the maintenance and easy availability of supplies of the commodities in the local market असे नमूद आहे.

अट क्र. ७ अन्वये The licensee shall exhibit at the business premises, the price list of the commodities held by him for sale. Such price list shall be legibly written in marathi or in the principal language of the locality concerned. It shall indicate separately the selling prices of different varieties of the commodities असे नमूद आहे.

अट क्र. ८ अन्वये The licensee shall, except when specifically exempted by the Government or by the licensing authority in this behalf, issue to every customer, a correct receipt or invoice or cash memo, as the case may be, for any sale exceeding Rs. 100 giving his own name, address, licence number, date of transaction, the quantity sold the price per kg/liter/package/tin and total amount charged and keep duplicate of the same to be made available for inspection on demand by the licensing authority of any other officer duly authorized in this behalf असे नमूद आहे.

अट क्र. १० अन्वये The licensee shall comply with any directions that may be given to him by the Government or by the licensing authority in regard to purchase, sale and storage for sale of the commodities and in regard to the language in which this register, returns, receipts or invoice mentioned paragraphs (3), (4), (7) and (8) shall be written and the authentication of maintenance of the same असे नमूद आहे.

अट क्र. १३ अन्वये The licensee shall by liable for departmental action, prosecution or both as the case may be for the breach of any condition of this licence or any directions or orders issued by the Government or licensing authority from time to time. असे नमूद आहे.

त्याचवेळेस उपभोक्त्यास देणे बंधनकारक आहे. तथापी, मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक यांनी घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री बिलांचा कोणताही तपशिल/अभिलेख सादर केला नसल्याने ते विना विक्री बिलांची अवैध विक्री करीत असल्याने त्यांचा संपूर्णत: अवैध व्यवसाय असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर गैरकृत्यामुळे मे. इंद्रा सेल्स एजन्सीसचे मालक यांनी परवानाधारक म्हणुन शासनाची विश्वासार्हता गमावली आहेच याशिवाय त्यांनी सदरचा अवैध व्यवसाय कार्यरत ठेवून इतर संबंधित शासकिय विभागांचीही दिशाभुल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मे. इंद्रा सेल्स एजन्सीसचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी विविध प्रकारचे कमी प्रतीचे खाद्यतेल अवैध मार्गाने विक्री करुन ते स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वेगवेगळ्या ब्रॅन्डचे लेबल लावून ते सदरचा साठा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून जनसामान्यांच्या जीवीतास धोका निर्माण करुन शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची घोर फसवणुक केली असल्याचे दिसुन येते. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ११(१), १३, १५(c)(i) तसेच सदर आदेशान्वये देण्यात आलेल्या घाऊक परवान्यामधील अट क्र. ३(i), ६, ७, ८, १० व १३ चा भंग केल्याचे सिद्ध होत आहे. सबब, घटनास्थळी जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये कोनगाव पोलिस ठाणे, ता. भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१२ दिनांक १३/०९/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) मे. इंद्रा सेल्स एजन्सीस यांचा जप्त करण्यात आलेला विविध प्रकारचा खाद्यतेलाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले रिकामे पत्र्याचे व प्लास्टिकचे डबे अंदाजे ८०० नग हे किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले पॅकींग/फिलींग मशिन २ नग हे मे. इंद्रा सेल्स एजन्सी यांचे उदरनिर्वाहाचे साधन असल्याने त्यांना बंधपत्र घेऊन परत करण्यात यावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/—
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. इंद्रा सेल्स एजन्सीचे मालक इंद्रवदन गोवर्धनभाई पटेल
२) कौशिकभाई गोवर्धनभाई पटेल, इंद्रवदन पटेल यांचे भाऊ
३) भौमिक इंद्रवन पटेल, इंद्रवदन पटेल यांचा मुलगा

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोनगाव पोलिस ठाणे, ता. भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कोनगाव पोलिस ठाणे, ता. भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.